**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रत्नागिरी जिल्हा)**

**(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने)**

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ४५/२०२०** | **दिनांक ०५/०६/२०२०** | **कालावधी ५ दिवस**


| **डॉ. प्रशांत बोडके,** | **डॉ. विजय मोरे,** | **डॉ. शितल यादव,** |
|---|---|---|
| विभाग प्रमुख, | नोडल ऑफिसर, | तांत्रिक अधिकारी |
| कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग |
| ९४२०४१३२५५ | ९४२२३७४००१ | ८३७९९०११६० |


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक ३०/०५/२०२० ते ०५/०६/२०२०) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक ०६/०६/२०१९ सकाळी ८:३० पासून १०/०६/२०२० सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३०/०५ | ३१/०५ | ०१/०६ | ०२/०६ | ०३/०६ | ०४/०६ | ०५/०६ | | ०६/०६ | ०७/०६ | ०८/०६ | ०९/०६ | १०/०६ |
| ० | ० | ० | १.० | २६.० | १०७.२ | १०३.८ | पाऊस (मिमी) | ८ | १० | १२ | ४ | १२ |
| ३४.८ | ३५.४ | ३५.१ | ३१.० | ३१.० | २८.० | ३०.० | कमाल तापमान (अं.से) | ३२ | ३२ | ३१ | ३१ | ३२ |
| २४.६ | २६.३ | २५.० | २४.० | २३.० | २४.० | १९.५ | किमान तापमान (अं.से) | २३ | २४ | २५ | २६ | २७ |
| ० | २ | ६ | ६ | ६ | ६ | ४ | मेघाच्छादन (ऑक्टा) | ३ | २ | १ | २ | ४ |
| ८२ | ७९ | ८३ | ८७ | १०० | ९२ | ९१ | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ९३ | ९२ | ९३ | ९० | ९१ |
| ६२ | ६२ | ९० | ९७ | १०० | १०० | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ६५ | ६५ | ६५ | ५८ | ६० |
| ६.० | ७.३ | ६.२ | ३.४ | ७.८ | १९.१ | ४.३ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ७ | ७ | ६ | ५ | ४ |
| शांत | शांत | नै. | नै. | आ. | नै. | प. | वाऱ्याची दिशा | आ.द. | द. | आ.द. | द. | द. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०२० पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| २३८.० | २४६.२ | ५१३०.९ |

**हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला**

**दिनांक ६ ते १० जून, २०२० दरम्यान हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता आहे.**

| पिक | अवस्था | *कृषि सल्ला* |
|---|---|---|
| **खरीप भात** | **रोपवाटिका** | • पुढील पाच दिवस हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता वर्तवली असल्याने भात रोपवाटिका पेरणीची कामे पूर्ण करून घ्यावीत.<br>• रोपवाटिकेसाठी तयार केलेल्या गादीवाफ्यावर प्रती आर शेत्रास १ कि.ग्रॅ. युरिया व ३ कि.ग्रॅ. सिंगल सुपर फॉस्फेट आणि ०.८ कि.ग्रॅ. म्युरेट ऑफ पोटश खते मिसळावीत. वाफ्यावर ७ ते ८ सें.मी. अंतरावर ओळीमध्ये १ ते २ सें. मी. खोलीवर बी पेरून मातीने झाकावे. पेरणीपूर्वी प्रति किलो बियाण्यास २.५ ग्रॅम थायरम बुरशीनाशक चोळून बियाणे पेरावे.<br>• रोपवाटीकेतील तणांच्या नियंत्रणासाठी पेरणीनंतर वाफे ओले होताच ऑक्सीडायरजील ६ ई. सी. ३ मि. ली. प्रती लिटर पाणी या प्रमाणात गादीवाफ्यावर एकसारखे फवारावे.<br>• जमिनीत ओलावा असल्याने भात पिकाची पुर्नलागवड करावयाच्या क्षेत्रामध्ये नांगरणी करावी आणि नांगरणीच्या वेळेस चांगले कुजलेले शेणखत एकरी ३ टन जमिनीत मिसळावे.<br>• भात रोपवाटिकेस ताण बसत असल्यास पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| **नागली** | **रोपवाटिका** | • पुढील पाच दिवस हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता वर्तवली असल्याने नागली रोपवाटिका पेरणीची कामे पूर्ण करून घ्यावीत.<br>• रोपवाटिकेसाठी तयार केलेल्या गादीवाफ्यावर प्रती गुंठा क्षेत्रास १ कि.ग्रॅ. युरिया खताची मात्रा द्यावी. वाफ्यावर दोन ओळीतील अंतर १० सें.मी. ठेवून बी ओळीत पेरावे. पेरणी विरळ व उथळ करावी. बी मातीने झाकून घ्यावे. पेरणीपूर्वी प्रति किलो बियाण्यास २.५ ग्रॅम थायरम बुरशीनाशक चोळून बियाणे पेरावे.<br>• जमिनीत ओलावा असल्याने नागली पिकाची पुर्नलागवड करावयाच्या क्षेत्रामध्ये नांगरणी करावी आणि नांगरणीच्या वेळेस चांगले कुजलेले शेणखत एकरी २ टन जमिनीत मिसळावे. |
| **आंबा व काजू** | **-** | • चक्रीवादळामुळे जी झाडे, झाडांच्या फांद्या मोडून पडलेल्या असतील ते स्वयंचलित करवतीच्या सहाय्याने तिरकस कापावीत आणि पाऊसाची तीव्रता कमी असताना कापलेल्या भागाला १ टक्के बोर्डो पेस्ट लावावीत. काजू आणि आंबा झाडांच्या बाबतीत कापलेल्या फांद्यावर व खोडावर किडींचा प्रादुर्भाव होवू नये म्हणून क्लोरपायरीफॉस २०% प्रवाही २० मि. ली. प्रति १० लिटर पाण्यात द्रावण करून संपूर्ण झाडावर पाऊसाची तीव्रता कमी असताना फवारणी करावी.<br>• मुख्यत: आंबा बागांमध्ये फळगळ झालेली फळे गोळा करून खोल जमिनीत गाडून द्यावीत जेणेकरून पुढील हंगामात फळमाशीचा प्रादुर्भाव कमी होण्यास मदत होईल. |
| **नारळ** | **-** | • नारळ बागांची साफसफाई करून गोळा होणाऱ्या काडीकचऱ्याची योग्य प्रकारे विल्हेवाट करावी.<br>• चक्रीवादळामुळे नारळाच्या कोंबाला इजा झाली असल्यास कोंब कुजव्या रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. यासाठी कोंबामध्ये १ टक्का बोर्डोमिश्रणाची आळवणी करावी.<br>• नारळ बागेमध्ये पावसाळ्यात बुरशीजन्यरोगामुळे फळगळ होण्याची शक्यता असल्याने प्रतिबंधात्मक उपाय म्हणून १ टक्का बोर्डोमिश्रणाची फवारणी करावी. |
| **सुपारी** | **-** | • सुपारी बागांची वाळलेल्या झावळ्या, शिंपुटे काढून साफसफाई करून गोळा होणाऱ्या काडीकचऱ्याची योग्य प्रकारे विल्हेवाट |

| | | |
|---|---|---|
| | | करावी.<br>• सुपारी बागेमध्ये पावसाळ्यात बुरशीजन्यरोगामुळे फळगळ होण्याची शक्यता असल्याने प्रतिबंधात्मक उपाय म्हणून पानांच्या बेचक्यात १ टक्का बोर्डोमिश्रणाची फवारणी करावी. |
| **भाजीपाला** | **रोपवाटिका** | • काकडी, चिबूड, पडवळ, दोडका, कारली या वेलवर्गीय भाजीपाला पिकांची लागवड करावी. लागवड आळे पद्धतीने १.५ x १.० मीटर करावी. लागवड करताना प्रत्येक आळ्याला २ किलो शेणखत व ५० ते ६० ग्रम मिश्रखत (सुफला) मातीत मिसळून देण्यात यावे.<br>• वांगी, मिरची, टोमेटो आणि इतर भाजीपाला पिकाची रोपवाटिका तयार करावयाची राहिली असल्यास, रोपवाटिका पेरणीची कामे पूर्ण करून घ्यावीत. रोपे तयार करण्याकरिता ३ मी. लांब x १ मी. रुंद x १५ से.मी. उंचीच्या गादीवाफ्यावर प्रती चौरस मीटर ५ किलो शेणखत, ३५ ग्रॅम युरिया, १०० ग्रॅम सिंगल सुपर फॉस्फेट व २५ ग्रॅम म्युरेट ओफ पोटेश मिसळून भाजीपाला बियाणांची पेरणी करावी. पेरणीपूर्वी बियाण्यास ३ ग्रॅम प्रती किलो प्रमाणे थायरम बुरशीनाशक चोळावे. तसेच रोपांचे मर रोगापासून संरक्षण करण्यासाठी पेरणीपूर्वी ३ ते ४ दिवस वाफ्यावर १ टक्का बोर्डोमिश्रणाची भिजवण करावी.<br>• रोपवाटीकेतील वांगी, मिरची, टोमेटो इ. भाजीपाला रोपांच्या जोमदार वाढीसाठी पेरणीनंतर १५ दिवसांनी प्रत्येक वाफ्यास ५० ग्रॅम युरिया खताची मात्रा द्यावी तसेच रोपवाटिकेला ताण बसत असल्यास पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| **दुभती जनावरे/ शेळ्या** | **-** | • जनावरांना पिण्यासाठी स्वच्छ पाण्याची व्यवस्था करावी तसेच गोठयामध्ये हवा खेळती राहील याची काळजी घ्यावी.<br>• जनावरांचे येणाऱ्या पाऊसापासून योग्य ते संरक्षण करावे.<br>• जनावरांना आंत्रविषार रोगावर प्रतिबंधात्मक उपाय म्हणून पशु वैद्यकिय अधिकारी सल्ल्याने सर्व जनावरांना लसीकरण करून घ्यावे. |
| **टिप: पाऊसाची तीव्रता कमी असताना कीटकनाशकाच्या आणि बुरशीनाशकाच्या फवारण्या कराव्यात तसेच पाऊसात द्रावण पानांवर चिकटून राहण्यासाठी फवारणीच्या द्रावणात स्टिकर मिसळून फवारणी करावी.** | | |
| **सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसार तयार करून प्रसारित करण्यात आली.**<br>**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा.** | | |